**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विशेष पदयात्रांचं आयोजन
- महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना वर्ष २०२६ अखेर १२ तास मोफत वीजपुरवठा देण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- वैशाखी सह सुगीच्या सणांचा देशभरात उत्साह

**आणि**

- रशियानं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात युक्रेनमधल्या ३२ नागरिकांचा मृत्यू, ८४ जण गंभीर जखमी

**<><><><><>**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या एक दिवस आधी महाराष्ट्रासह देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढली जात आहे.

आंबेडकर जयंतीनिमित्त युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आज मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या. नरिमन पॉइंट पासून मंत्रालयातल्या आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत हजारो संख्येनं तरुण सहभागी झाले.

**होल्ड बाईट- रक्षा खडसे...**

आंबेडकर जयंतीनिमित्त **ऐरोली**तल्या बाबासाहेबांच्या ज्ञानस्मारकाला भेट देणारी मोठी जनसंख्या विचारात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यक ते सर्व नियोजन करण्यात आलं आहे.

**पालघर** जिल्ह्यातही भीम पदयात्रा काढण्यात आली.

**रत्नागिरीत**ल्या छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणातून जयभीम पदयात्रा काढण्यात आली. संविधान उद्देशिकेच्या वाचनानंतर या पदयात्रेचा समारोप झाला.

**नांदेड** आणि **बीड** इथंही आज जिल्हा प्रशासन, जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्राच्या समन्वयानं जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

**गोंदिया**त आंबेडकर जयंती निमित्त  बाईक रॅली काढत काढण्यात आली.

**धुळ्यात** जय भीम पदयात्रा उत्साहात संपन्न झाली.

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी आज बिहारमध्ये पटना इथून पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिवादन केलं असून, देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. बाबासाहेबांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून देदीप्यमान कामगिरी करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.  अलौकिक क्षमतांनी उजळून निघालेलं त्यांचं जीवन कार्य प्रेरणादायी आहे, असं राष्ट्रपतींनी शुभसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या हरियाणाला भेट देणार आहेत. सर्वप्रथम ते हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेला हिरवा झेंडा दाखवतील आणि हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी करतील. हिसार इथं ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर, यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज केंद्राच्या

८०० मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज प्रकल्पाची ते पायाभरणी करतील. या प्रकल्पामुळे हरियाणात गावोगावी अखंडित वीजपुरवठा करण्याच्या कामाला चालना मिळणार आहे. भारतमाला परियोजने अंतर्गत सुमारे १७० कोटी रुपये किमतीच्या सुमारे साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटनही मोदी करतील. यामुळे दिल्ली ते नारनौल प्रवासाचा वेळ सुमारे एक तासाने कमी होईल.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच ग्राम विकास, कृषी क्षेत्र तसंच पशुसंवर्धन क्षेत्राचं परस्पर सामायिक दृष्टीकोनातून एकात्मिकरण घडवून आणलं असल्याचं केंद्रीय गृह तसंच सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज मध्यप्रदेशात भोपाळ इथं आयोजित राज्यस्तरीय सहकार परिषदेला संबोधित केलं. केंद्र सरकारने सहकार क्षेत्रांच्या नियमांचं मानकीकरण केलं, आणि त्या अंतर्गतचे नियम सर्व राज्यांनी स्वीकारले अशी माहिती त्यांनी दिली. यामुळे सहकार क्षेत्राला नवसंजीवनी मिळाली असल्याचं ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातल्या केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळेच सहकार क्षेत्रात हे बदल घडून आले असल्याचं त्यांनी सांगितलं.

या परिषदेअंतर्गत मध्य प्रदेश दूध संघ आणि राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामध्ये राज्यातल्या सहकारी दूग्ध संस्थांची संख्या वाढवण्यासंबंधीचा सामंजस्य करारही केला गेला.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना वर्ष २०२६ अखेर १२ तास मोफत वीजपुरवठा केला जाईल तसंच पुढील पाच वर्षात दरवर्षी वीज बीलाची रक्कम कमी होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. वर्धा जिल्ह्यात आर्वी इथं ७२० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण आज फडणवीस यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. राज्यात विजेचे दर ५ वर्षांसाठी स्थिर करुन राज्यशासनाने वीज ग्राहकांना दिलासा दिल्याचं ते म्हणाले. पाणी आणि वीज पुरवठ्याकरता सरकारने हाती घेतलेल्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. समृद्धी महामार्गामुळे देशव्यापी दळणवळण व्यवस्थेत विदर्भ केंद्रस्थानी आला असून तिथं औद्योगिक विकास करण्यासाठी शासन वचनबद्ध आहे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारताच्या परकीय चलन साठ्यात गेल्या आठवड्यात दहा अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढ झाली आहे. यामुळे भारताचा परकीय चलन साठा ६७६ अब्ज डॉलर्सच्या स्तरावर पोहचला आहे. दरम्यान देशाच्या सोन्याच्या साठ्यातही दीड अब्जाहून जास्त वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये रिझर्व्ह बँकेचे स्थान ४ कोटी डॉलर्सने वाढून ४ अब्ज ४६ कोटी डॉलर्स झालं आहे.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात आज सुगीच्या सणांचा उत्साह दिसत आहे. पंजाबमधे वैशाखी, केरळात विशु, पश्चिम बंगालमधे पोईला बोईशाख आसामात बोहाग बिहू तर तमिळनाडूत पुथंडूच्या रुपाने हे सण साजरे केले जातात. देशाच्या उत्तर भागात वैशाखी उत्साहाने साजरी होत आहे. विशू आणि पुथंडू उद्या साजरे होणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या उत्सवामधून देशाच्या विकासाकरता समर्पणाचा संदेश मिळतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. या विविधरंगी उत्सवांमधून भारताची समृद्ध आणि विविधतेने नटलेली कृषीवल संस्कृती दृग्गोचर होते असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्षं पूर्ण होत आहेत. या हत्याकांडात बळी पडलेल्या हुतात्म्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग मैदानावर भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्यांना आपण आदरांजली अर्पण करत असून भारताची जनता सदैव त्यांची ऋणी राहील. त्यांच्या प्रेरणेने भारताचा प्रत्येक नागरिक देशाच्या प्रगतीसाठी आपलं योगदान देत राहील, असं मुर्मू आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या शूरांचं अतुलनीय बलिदान कोरलं गेलं असून देश त्यांचा सदैव ऋणी राहील, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी शहिदांना आदरांजली वाहताना म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही जालियनवाला बाग हत्याकांडातल्या शहीदांना आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग हत्याकांडात शहीद झालेल्यांचं बलिदान स्वातंत्र्य लढ्यातला एक महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांना हे बलिदान सदैव प्रेरणादायी राहील, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

युक्रेनच्या ईशान्य भागातील सुमी शहरात आज रशियानं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात दोन मुलांसह ३२ लोक ठार झाले तर, ८४ जण गंभीर जखमी झाले आहेत अशी माहिती युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. जखमींमध्ये दहा लहान मुलांचाही समावेश असल्याचं या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. पाम संडेच्या निमित्तानं नागरिक मोठ्या संख्येनं चर्चमधल्या प्रार्थना सभेसाठी जमले होते, तसंच रस्त्यांवरही मोठी गर्दी होती त्यावेळी हा हल्ला झाला. २०२३ नंतर रशियानं युक्रेनच्या नागरिकांवर केलेला हा सर्वात प्राणघातक हल्ला ठरला आहे.

हा हल्ला दहशतवादी कृत्य असल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे. या हल्ल्याविरोधात जगभातल्या इतर देशांनी कठोर प्रतिक्रिया द्यावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं झालेल्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं राजस्थान रॉयल्सवर ९ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात बंगळुरुनं नाणेफेक जिंकून राजस्थानला फलंदाजीसाठी पाचारण केलं होतं. त्यानंतर राजस्थाननं निर्धारित २० षटकांत ४ बाद १७३ धावा केल्या होत्या. बेंगळुरुनं केवळ १७ षटकं आणि ३ चेंडूत १७५ धावा करत विजयी लक्ष्य गाठलं. या सामन्यात विराट कोहलीनं ४५ चेंडूत ६२ धावा करत, टी-२० कारकीर्दीतलं १००वं अर्धशतक झळकावलं.

स्पर्धेत आज दिल्ली इथं मुंबई इंडिअन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरू आहे. या सामन्यात दिल्लीनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ८ व्या षटकात मुंबईच्या २ बाद ७५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

भारत आणि रशिया यांच्यातल्या राजनैतिक संबंधांना ७८ वर्षे पूर्ण झाल्या निमित्तानं आज नवी दिल्लीत एका सायकल रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. या रॅलीत ३०० पेक्षा जास्त नागरिक सहभागी झाले होते. यानिमित्तानं १९४१-१९४५ युद्धातल्या रशियाचा विजयोत्सवही साजरा केला गेला. भारतातले रशियाचे राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनीही यानिमित्तानं शुभेच्छा दिल्या आहेत.

**//<><><><><>//**